केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंमलबजावणीकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ नुसार राज्यस्तरीय मान्यता समिती (SLSC) व नोडल यंत्रणा (SLNA) गठित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्र. केंपुयो २०२२/प्र.क्र.१५/जल-८**
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २७ एप्रिल, २०२२.

वाचा:-

१. मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.आस्थाप २०१६/प्र.क्र.८८ भाग-९/जल-२ दि. ३१, मे, २०१७
२. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.मविसे-१०१३/प्र.क्र.५७/२०१३/ आस्था-३, दि. २१.०२.२०१३
३. केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश क्रमांक DO. NO.Z-११०११/११/२०१९-PPC दि. १५ नोव्हेंबर २०१९
४. केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश क्रमांक DO. NO.Z-११०११/०४/२०१९-PPC दि. १६ मार्च २०२१
५. मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, शक्ती प्रदत्त समिती यांचे अध्यक्षेतखाली संपन्न झालेल्या दि. १६ एप्रिल, २०२१ रोजीच्या १० व्या बैठकीतील ठराव क्रमांक ११ दि. १९ मे २०२१ रोजीचे इतिवृतांत.
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कृषि आयुक्त यांचे पत्र क्रमांक १० वी बैठक/अनुपालन अहवाल/३१६५९ दि. २४.०९.२०२१
७. मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक न्यूप्राप-२०२१/प्र.क्र५२/ जल-८, दि. २७ जुलै २०२१.
८. महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन कंत्राटी मनुष्यबळ व्यवस्थापन परिपत्रक मग्रारो-२०२०/प्र.क्र७७/रोहयो-७ दि. २५.०८.२०२१
९. मृद व जल संधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२१ प्र.क्र५२/ जल-११ दि. २४ सप्टेंबर, २०२१
१०. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कृषि आयुक्त यांचे वपावीय/वसुंधरा हस्तांतरण/२०२१/१३४७४४/ दि.२०.१०.२०२१
११. मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक केपुगो-२०२१/प्र.क्र.१०९/ जल-८ दि. २७ ऑक्टोंबर २०२१
१२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कृषि आयुक्त यांचे वित्त/पीएमकेएसवाय-डब्ल्यूडीसी २.०/ ऑक्टोंबर २०२१/३६४४७/२०२१ दि. २८.१०.२०२१
१३. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.एपाव्य २०१४/प्र.क्र.३८/जल-८, दि. १९ ऑगस्ट, २०१४.

**प्रस्तावना:-**

राज्यात गेल्या काही वर्षात जल संधारणाच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये जल संवर्धन या संकल्पनेला जादा महत्व देऊन मृद संधारण प्रक्रियेकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. बंडिग, सिमेंट बंधारे यांच्या

बरोबरच मृद संधारण, समपातळी, वृक्ष लागवड या बाबींकडे जितक्या प्रमाणात लक्ष देणे व त्यांची अमंलबजावणी करणे आवश्यक होते त्या प्रमाणात लक्ष केंद्रित झालेले नाही असे शासनास आढळून आले आहे. या शिवाय जल संवर्धनाची कामे करताना नाला बंडिंग , भूमिगत बंधारे , गॅबियन बंधारे यासारखी बांधकामे करताना त्या जागा जल पुनर्भरणसाठी योग्य आहेत की नाहीत , ही बाब तांत्रिक दृष्ट्या तपासून घेणाची आवश्यकता असताना सुध्दा या बाबीकडे योग्य त्या प्रमाणात लक्ष दिले गेलेले नाही ,असे आढळून आले आहे. गेल्या ५ वर्षात पिण्याच्या पाण्याची समस्या असणा-या गावातील पिण्याच्या पाण्याचे स्रोत जल संधारणामार्फत बळकटीकरणाचा कार्यक्रम पारंपरिक तसेच अपारंपरिक तंत्रज्ञाच्या माध्यमातून सातत्याने हाती घेण्यात आलेला आहे. याअन्वये शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, पूर्वी गाव तलावांच्या माध्यमातून पूर्वी गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत होता.

राज्यामध्ये पडीक जमिनीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे, या पडीक जमिनीचा विकास करून ग्रामीण जनतेला रोजगार, उपजिवीका, आर्थिक स्तर उंचावणे व त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे. तसेच या प्रकल्पामध्ये योग्य प्रकारे मृद संधारणाची कामे करून जमिनीची उत्पादकता वाढविणे या उद्देशाने केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० हा प्रकल्प मृद व जल संधारण विभागामार्फत राबविण्याचा उद्देश आहे. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांच्या अध्यक्षतेखाली दि. १२.०४.२०२२ रोजी उच्चस्तरीय समितीची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० ही योजना मृद व जलसंधारण विभागामार्फत राबविणे व यापूर्वीचा जुन्या योजनेचा म्हणजेच प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक १.० या योजनेस चालू असलेले लेखाशिर्ष हे नवीन केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० या योजनेसाठी चालू ठेवण्यासाठी मान्यता प्रदान केली व त्यास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २५.०४.२०२२ रोजी मान्यता दिली आहे.

केंद्र शासनाचे संदर्भाधीन आदेश क्रमांक ३ व ४ अन्वये जिल्हा, तालुका स्तरावरील मृद संधारण कामांचे बळकटीकरण व संस्थात्मक बांधणी नियमित व पूर्णवेळ असणा-या मृद संधारण अधिका-यांच्या मार्फत देखरेख करणे बाबत व मृद संधारणावर भर देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये नमूद केलेल्या अटी व शर्ती नुसार सदर योजना राज्यात राबविण्यासाठी मंजूरी मिळाली आहे. सन २०२१-२०२२ पासून नव्याने मंजूर होणा-या पाणलोट प्रकल्पांकरिता सामाईक मार्गदर्शक सूचना लागू झाल्या आहेत. या मार्गदर्शक सुचनानुसार व वरील सर्व बाबी लक्षात घेऊन मृद संधारणाच्या नवीन योजना राबविण्याच्या दृष्टीकोणातून नियोजनाच्या प्रक्रियेत, प्रकल्पातर्गत बाबींचा पुनर्विचार व लोक सहभागाची संकल्पना अंतर्भूत करून मृद व जल संधारण कार्यक्रमाची पुर्नमांडणी करणे, तसेच राज्यातील मृद संधारण निधीचा विनियोग, नियोजन व देखरेख इ. बाबींची व्याप्ती विचारात घेऊन आर्थिक व प्रशासकीय कामात गतीमानता व सुसूत्रता आणणे, जिल्हा, तालुका स्तरावरील मृद संधारण कार्यालयांचे बळकटीकरण, पुर्नरचना व संस्थात्मक बांधणी इ.ची देखरख ही नियमित व पूर्णवेळ असणा-या मृद संधारण अधिका-यामार्फत करणे, तसेच सद्यस्थितीत कार्यरत असलेले अनुभवी व कुशल कंत्राटी मनुष्यबळाची जोड देणे इ. करिता राज्य स्तरावर मान्यता समिती व राज्यस्तरीय नोडल यंत्रणा स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे मार्फत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक-२.० या प्रकल्पाकरिता सामाईक मार्गदर्शक सूचना २०२१ निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार राज्यात प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक-२.० ही योजना राज्यात राबविण्यास

या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक-१.० (IWMP) या पूर्वीच्या योजनेचे दायित्व व बर्हीगमन पुर्वीचे अंमलबजावणी यंत्रणा म्हणुन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्त कृषि व अपर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा संचालक, मृद संधारण, पुणे यांची राहिल. जुन्या योजनेचे दायित्व अदा केल्यानंतर तेच लेखाशिर्ष नवीन योजनेस वापरण्यात येईल.

२. उपरोक्त सामाईक मार्गदर्शक सूचना २०२१ नुसार केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी या मार्गदर्शक सुचनास अनुसरून PMKSY-WDC करिता प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० हा कार्यक्रम जाहीर केला आहे.

३. केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार केंद्र स्तरावर खालील प्रमाणे शासन व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे.

I) केंद्रिय भूसंसाधन विभाग हा नोडल विभाग शिखर स्थानी असणार आहे.
II) ग्रामीण विकास मंत्रालय हे सबंधीत मृद व जल संधारण कार्यक्रमाकरिता "नोडल मंत्रालय" म्हणून काम पाहतील
III) National Level DATA Centre कार्यरत राहील.

४. केंद्र शासनाच्या या मार्गदर्शक सूचना व केंद्र शासनाचे संदर्भाधीन क्रमांक -३ व ४ च्या आदेशातील अटी व शर्तीनुसार खालील प्रमाणे राज्यस्तरावर शासन व्यवस्था निर्माण करावयाची आहे.

I) मृद व जल संधारण विभाग हा नोडल विभाग शिखर स्थानी असणार आहे.
II) राज्यात २.० या योजनेचे सनियंत्रण वअमंलबजावणी पूर्णपणे मृद व जलसंधारण विभागामार्फत करण्यात येईल.
III) मृद व जल संधारण विभाग हे सबंधीत मृद व जल संधारण केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास घटक २.० या योजनेच्या कार्यक्रमाकरिता "नोडल मंत्रालय" म्हणून काम पाहतील.
IV) SLSC, SLNA, SLTC
V) राज्यस्तरीय माहिती केंद्र (एम.आय.एस.)
VI) जिल्हा स्तरावर जिल्हा पाणलोट पाणलोट कक्ष व माहिती केंद्र

५. केंद्रिय भूसंसाधन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे संदर्भाधीन क्रमांक -२ व ३ च्या आदेशातील अटी व शर्तीनुसार व सामाईक मार्गदर्शक सूचना नुसार १ एप्रिल २०२२ पासून नव्याने सुरु होणा-या मृद संधारण प्रकल्पांचे काम पाहण्यासाठी तसेच केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - पाणलोट विकास योजने अंतर्गत समविष्ठ तांत्रिक विभागामधील समन्वय व आवश्यकतेनुसार क्षेत्रीय स्तरावरील यंत्रणेस सल्ला/ मार्गदर्शन/अडचणीचे निराकरण/शासन - प्रशासन स्तरावरील धोरणात्मक निर्णय देण्याकरिता मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मान्यता समिती (SLSC) व सचिव (मृद व जल संधारण) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (SLNA) स्थापन करण्यास या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात येत आहे.

५.१. **मा. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मान्यता समितीची (SLSC) ची रचना खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव, | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,ग्रामविकास विभाग | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,जलसंपदा | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,रो. ह. यो. विभाग | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,पाणीपुरवठा विभाग | सदस्य |
| ९ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,कृषि विभाग | सदस्य |
| १० | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मृद व जल संधारण विभाग | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे :-**

१) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - एकात्मीक पाणलोट विकास कार्यक्रम १.० या योजनेच्या, संबंधित विभागांचा आढावा घेऊन , या प्रकल्पाच्या बर्हिगमना बाबत केंद्र सरकारला अहवाल सादर करणे.

२) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनांच्या निधीचे परिणामकारक व्यवस्थापन करणे.

३) तसेच निधी विनियोगाच्या प्रक्रियेत अधिक परिणामकारकता आणण्याच्या दृष्टीने निर्देश देणे.

४) केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या राज्यस्तरावरील नोडल यंत्रणेचे सर्व स्तरावरील बळकटिकरण करणे केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना अंमलबजावणी अनुषंगिक मान्यता प्रदान करणे.

५) केंद्र व राज्य शासनाच्या इतर सामाईक योजनांचे मॅपींग करणे बाबत धोरण आखणे.

६) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित विभागांचा समन्वय करणे व आढावा घेणे.

५.२. **अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (मृद व जलसंधारण ) यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नोडल यंत्रणा (SLNA) ची रचना खालीलप्रमाणे :-**

| अ. क्र | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (मृद व जलसंधारण ) | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (वने) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (नियोजन) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (वित्त ) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सामान्य प्रशासन) अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (कृषि) अथवा त्याचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (पाणी पुरवठा व स्वच्छता) अथवा त्याचे प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (पदुम) अथवा त्याचे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | अपर मुख्य सचिव (ग्रामविकास) अथवा त्याचे प्रतिनिधी | सदस्य |
| १० | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव(कामगार) ,उद्योग,ऊर्जा व कामगार विभागअथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | महासंचालक, वाल्मी, औरंगाबाद. | सदस्य |
| १२ | सह/उपसचिव ( मृद व जलसंधारण ) | सदस्य |
| १३ | अवर सचिव (मृद व जलसंधारण ) | सदस्य |
| १४ | राज्य प्रमुख, एनआयसी, मुंबई | सदस्य |
| १५ | आयुक्त कामगार, मुंबई | सदस्य |
| १६ | आयुक्त, मनरेगा, नागपूर | सदस्य |
| १७ | आयुक्त, कृषि , पुणे | सदस्य |
| १८ | संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| १९ | आयुक्त, पशुसवर्धन | सदस्य |
| २० | आयुक्त, दुग्ध व्यवसाय | सदस्य |
| २१ | आयुक्त, मत्स्यव्यवसाय | सदस्य |
| २२ | ग्रामीण विकास मंत्रालय/ नाबार्ड यांचे प्रतिनिधी /केंद्रीय भूसंसाधन विभाग यांनी नामनिर्देशीत केलेले सदस्य | सदस्य |
| २३ | अध्यक्ष,नवोदय कृषि संशोधन व ग्रामिण विकास प्रतिष्ठान, सांगली | सदस्य |
| २४ | अपर मुख्य कार्यकारी अधिकारी , वसुंसधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| २५ | आयुक्त, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,पुणे. | सदस्य सचिव |

**<u>समितीची कक्षा खालील प्रमाणे :-</u>**

१. जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर तयार करण्यात आलेले पाणलोटांचे यथार्थ दर्शी आराखडे, ज्यामध्ये पाणलोट विकासाचे धोरण, वित्तीय नियतव्यय, अपेक्षित साध्य, फलनिष्पती, यांचा समावेश असून त्याआधारे राज्याचा आराखडा तयार करणे व मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे मान्यता समिती तथा शक्ति प्रदत समिती मार्फत मंजूर करून केंद्रिय नोडल एजन्सी मार्फत मान्यता घेणे.

२) राज्याला मंजूर होणा-या निधीमधून तांत्रिक सस्थेमार्फत आराखडा तयार करणे व केंद्रिय एम.आय.एस व पीएफएमएस सोबत जोडणे

३) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय तांत्रिक समिती (एसएलटीसी), वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा व जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरावर पाणलोट विकास युनिट यंत्रणा यांना SLNAकडून मार्गदर्शन, सनियंत्रण व अनुषंगिक मान्यता प्रदान करणे. तसेच योजनेच्या उदिष्टपूर्ती व प्रगतीसाठी दर माह किंवा आवश्यकतेनुसार बैठक घेऊन वेळोवेळी आढावा घेणे.

४) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक, विविध यंत्रणा, प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणा यांची निवडसूची तयार करणे.

५) राज्य स्तर, जिल्हा स्तर, तालुका स्तरावरील कंत्राटी मनुष्यबळ व्यवस्थापन धोरण ठरविणे (नियुक्ती/ रजा/वार्षिक वेतनवाढ/भविष्य निधी/वैद्यकीय लाभ/आरोग्य विमा/मृत्यु विमा/मनुष्यबळ अपील-सुनावणी/ सेवेतून काढून टाकणे, वैधानिक देणी व अनुषंगीक इतर सर्व बाबी)

६) विविध स्तरावर अंतर्गत बाहय/त्रयस्थ संस्थामर्फत संनियंत्रण मूल्यांकन करण्याकरिता यंत्रणा स्थापन करणे.

६. योजनेच्या प्रभावी अमंजबजावणीसाठी शासन स्तरावरुन आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येतील.

७. तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना २०२१ मधील परिच्छेद क्र.९ नुसार प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना -पाणलोट विकास घटक २.० ही योजना कार्यरत राहील.

८. तसेच सदर शासन निर्णय केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनास अनूलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२२०४२७१७४२२७९७२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

SHUBHANGI ASHAY POTE

Digitally signed by SHUBHANGI ASHAY POTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f67e195634f0df9371bbf2f3aca86f9d3e8da3b165ed00c4c12c06e309cd2784, pseudonym=DAD653D6BA3164645B65E9411C151EE25201A1D8, serialNumber=1A3686057BA04185ADDB654EDEC4DE91E5E9AA1E243BAE1702175810F69A3E15, cn=SHUBHANGI ASHAY POTE
Date: 2022.04.29 17:20:35 +05'30'

**( शुभांगी पोटे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव ,
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,
३. मा. मंत्री , जलसंधारण , यांचे खाजगी सचिव
४. सर्व मंत्री , राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,
५. मा. राज्यमंत्री, जलसंधारण , यांचे खाजगी सचिव
६. मा. मुख्य सचिव, यांचे सहसचिव
७. शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव ,
८. अपर मुख्य सचिव (वित्त)
९. अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन )
१०. अपर मुख्य सचिव ( वने )
११. अपर मुख्य सचिव ( नियोजन )
१२. अपर मुख्य सचिव (जलसंपदा )
१३. अपर मुख्य सचिव (रोजगार हमी योजना)
१४. प्रधान सचिव (उद्योग उर्जा व कामगार)

१५. प्रधान सचिव ( कृषि )
१६. प्रधान सचिव ( पाणी पुरवठा व स्वच्छता )
१७. सचिव ( पदुम )
१८. सचिव ( जलसंधारण )
१९. सचिव ( ग्रामविकास )
२०. आयुक्त, मृद व जलसंधारण, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद
२१. प्रधान मुख्य वन सरंक्षक , नागपूर , महाराष्ट्र राज्य , नागपूर ,
२२. सर्व विभागीय आयुक्त ,
२३. आयुक्त ( कृषि ) , महाराष्ट्र राज्य , पुणे ,
२४. महासंचालक , वाल्मी, औरंगाबाद
२५. महासंचालक , माहिती व जनसंपर्क , मुंबई ( प्रसिध्दी करीता ) ,
२६. राज्य प्रमुख , एन्.आय् . सी . मुंबई,
२७. आयुक्त,(कामगार), मुंबई
२८. आयुक्त, मनरेगा, नागपूर
२९. आयुक्त (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्यस्य व्यवसाय )
३०. संचालक , सामाजिक वनीकरण संचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे ,
३१. संचालक , भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , पुणे ,
३२. संचालक , मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन , महाराष्ट्र राज्य , पुणे
३३. संचालक , अर्थ व सांख्यिकी संचालनालय , मुंबई ,
३४. संचालक , महाराष्ट्र सूदूर संवेदन केंद्र , नागपूर
३५. उपसंचालक , सामाजिक वनीकरण
३६. सर्व जिल्हाधिकारी , सर्व उपजिल्हाधिकारी ( रोहयो )
३७. सर्व उपायुक्त ( विकास )
३८. सर्व मुख्य अभियंता , पाटबंधारे
३९. मुख्य अभियंता , लघु पाटबंधारे ( स्थानिक स्तर ) , पुणे
४०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद ,
४१. सर्व प्रकल्प संचालक , जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ,
४२. सर्व अधीक्षक अभियंता , पाटबंधारे ,
४३. सर्व अधीक्षक अभियंता , लघु पाटबंधारे , ( स्थानिक स्तर )
४४. वरिष्ठ भूवैज्ञानिक
४५. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
४६. जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी
४७. विभागीय कृषि सहसंचालक , ठाणे , पुणे , कोल्हापूर , नाशिक , औरंगाबाद , अमरावती , नागपूर , लातूर .
४८. सर्व अधिक्षक कृषि अधिकारी ,

४९. सर्व सहसंचालक , सामाजिक वनीकरण वृत्ते - नागपूर / अकोला / औरंगाबाद / नाशिक / कोल्हापूर / कोकणवृत्त
५०. अपर मुख्य कार्यकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.
५१. अध्यक्ष, नवोदय कृषि संशोधन व ग्रामिण विकास प्रतिष्ठान, सांगली,
५२. सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उपवनसंरक्षक
५३. सर्व विभागीय वनसंरक्षक / सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी ,
५४. सर्व उपसंचालक , सामाजिक वनीकरण विभाग ,
५५. सर्व सदस्य , महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद .
५६. प्रमुख मार्गदर्शक , महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद
५७. महालेखापाल , ( लेखापरिक्षा ) , महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर ,
५८. महालेखापाल , ( लेखा व अनुज्ञेयता ) , महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर ,
५९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
६०. सर्व मंत्रालयीन विभाग,
६१. सर्व कार्यासने/अधिकारी,मृद व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई.
६२. निवडनस्ती-जल-०८.